# ''उचला रे उचला''

दोन तास अर्थपुर्ण विनोदाने व व्यंगाने नटलेला कौटुंबिक, करमणुक योग्य असा हा चित्रपट **''उचला रे उचला''** .

मृत्युच्या हातात म्हणजेच यमाच्या हातात कसलं फर्मान आहे? आज त्याच्या यादीत कुणाची नावे आहेत, कुणास ठाऊक !! मृत्यु अटळ सत्य, धडकी भरवणार !! वाईट, खिन्न मानलं जाणारं वास्तव. पण यमसुध्दा चुकु शकतो आणि यदाकदाचित चुकलाच वा कुणाच्या हातून चुक झाली तर काय होऊ शकते, याचे खुमासदार चित्रण म्हणजेच **''उचला रे उचला''.**

महाभारतात जगातले सर्वात मोठे आश्चर्य कोणते आहे ? या प्रश्नावर धर्मराजाने उत्तर दिले होते की, मरण अटळ आहे, हे माहीत असुनही या पृथ्वीतलावर जन्माला येणारा प्रत्येक माणुस मरणाला घाबरतो, हे या जगातले सर्वात मोठे आश्चर्य आहे. स्वतःच्या मरणाबाबत एवढा संवेदनशिल असणारा माणुस दुसऱ्याच्या मरणाबाबत मात्र कमालीचा उदासिन व काहीवेळा स्वार्थी असतो. प्रत्येकाचे मरण हे वर स्वर्गात ठरवले जाते, अशी आपली धारणा आहे. पण जर एखाद्याचे मरण ठरवायचा अधिकार आपल्याला प्राप्त झाला तर आपण निस्पृहपणे निर्णय देऊ की स्वहिताचा, स्वार्थाचा विचार करुन निर्णय देऊ?

भक्तीयोग सोसायटीत राहणारे रामकाका कुलकर्णी हे ५५ ते ६० या वयाचे गृहस्थ. दिवसा घडलेल्या काही गोष्टींना अनुसरुन रात्री स्वप्न पडणं, ही यांची सवय !! रामकाकांना पडलेल्या एका दिर्घ स्वप्नाची ही कथा !! त्यादिवशी रामकाका स्वप्नात पाहतात की सोसायटीच्या अंगणात मयताची तयारी चालु आहे. कोण गेले? अशी चौकशी केल्यावर त्यांनी धक्काच बसतो. कारण त्यांचाच मृत्यु झाल्याची बातमी आहे !!

रामकाकांची पत्नी चिमाकाकु खाली येते. तिला सर्वांकडुन कळतं की सकाळी यमाचा फोन आला होता, त्याने राम कुलकर्णी वारलेत , त्यांना वर पाठवा असा निरोप पाठवला आहे ! चिमाकाकु सर्वांच्या निदर्शनास आणतात की पहिल्या मजल्यावर राहणारे रामभाऊ हे सुध्दा राम कुलकर्णीच आहेत. रामभाऊंना खाली बोलावण्यात येते.

रामभाऊ व रामकाका आपण फीट असल्याने मरणाचे चान्सेस दुसऱ्याचेच आहेत, असं सर्वांना पटवायचा प्रयत्न करतात. रामभाऊंची पत्नी कामिनी व चिमाकाकु यांची 'माझा नाही तुझाच नवरा मेलाय' अशी जुंपते. कुणीतरी सुचवते की, वर यमाला फोन करुन मयताच्या वडिलांचे नाव विचारुन कोण मेलंय ते कन्फर्म करु !! वर स्वर्गात लोडशेडिंग चालु असल्याने कॉम्प्युटर बंद असल्यामुळे मयताच्या वडिलांचे नाव समजु शकत नाही. या दोघांना डॉक्टरांकडे घेऊन जावे व त्याच्याकडुन कोण मेलंय ते कन्फर्म करावे असं कुणीतरी सुचवतं !! अंत्ययात्रेसाठी सजवलेल्या टेम्पोतुन वरात निघते !! डॉक्टर म्हणतो की, सर्व वैद्यकिय चाचण्या घेऊन तीन दिवसांनी कोण मेलंय, ते कन्फर्म होऊ शकेल. एवढं थांबायची कुणाचीही तयारी नाही !! कुणीतरी मिरॅकल बाबाचे नाव सुचवते. सर्व गोतावळा मिरॅकल बाबाच्या डोंगराळ गुहेत पोहोचतो. राम कुलकर्णीच्या आत्म्याला बोलावल्यावर गेल्या काही शतकांमध्ये मरण पावलेल्या शेकडो राम कुलकर्णींचे आत्मे प्रकट होऊ लागतात !! सर्वांची पळापळ होते !!

इथे चिमाकाकुंनी आपला अमेरिकेतला मुलगा विजु याला ही बातमी कळविली आहे !! विजु त्यांना समजावतो की रामकाकांच्या मरण्यातच आपले हीत आहे !! कामवाली रखमा ही बातमी कामिनी वहिनींना देते. आता चिमाकाकु व कामिनी या 'माझाच नवरा मेला आहे' असं भांडु लागतात. सर्वजण पुन्हा यमाला फोन लावतात. या परिस्थितीचा फायदा घेऊन यम चित्रगुप्तांकडुन आपली सुंदर सेक्रेटरी रेशम हिला घेऊन पृथ्वीवर डेप्युटेशनवर जाण्याची परवानगी मिळवतो व रेशमला घेऊन खाली जातो. खाली येऊन तो सर्वांना एक कमिटी बनवुन बहुमताचा निर्णय मान्य करण्याचे सांगतो, रेशमला घेऊन जीवाची मुंबई करायला सटकतो !! आठ जणांची कमिटी बनते!!

प्रत्येकजण आपापल्या स्वार्थाप्रमाणे रामकाका किंवा रामभाऊ असा निर्णय देतो . निर्णय टाय होतो !! यमाला पुन्हा फोन लावण्यात येतो. तो टॉस करुन निर्णय घ्यायला सांगतो. टॉस उडवला जातो. रामकाका हरतात. पण सर्वांना गुंगारा देऊन पळतात. त्यांना शोधण्यासाठी सर्वजण गल्लीतील भाई व त्याची गँग व पोलीस ऑफीसर प्रयत्न करतात ! पण रामकाका भेटत नाहीत.

**''पुढे काय होते ते तुम्ही प्रत्यक्ष सिनेमा पहा म्हणजे कळेल''**. ठासुन विनोद , धुंद संगीत, खुमासदार संवाद यांनी नटलेला अर्थपुर्ण विनोदी चित्रपट **''उचला रे उचला''..**